| MHRG130000552025 | **नियमित दिवाणी दावा क्र.०४/२०२५ मधील निशाणी क्र.२२ खालील आदेश** |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशीका ४० नियम १ अन्वये दावा मिळकतीबाबत न्यायालयाचा प्राप्तकर्ता (कोर्ट रिसिव्हर) नियुक्ती होणेकरिता दाखल केलेला आहे.

०२. **वादीचे थोडक्यात कथन पुढीलप्रमाणे –**

वादीचे असे कथन आहे की, आता सन २०२५ चे पाडा करण्याचा हंगाम आला आहे. वादीने सन २०२३–२०२४ व जुन २०२४ ते मार्च, २०२५ या कालावधीत गाव कोलमांडले, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील भुमापन क्र. १९९ क्षेत्र २–३३–०० आर्स, आकार रु.०–९६/– या दावा मिळकतीत असलेले सुमारे १२५ आंब्याच्या झाडांची योग्य ती देखभाल खत फवारणी करुन आता दावा मिळकतीत आंब्याचे पिके उभे आहे. प्रतिवादी आता बेकायदेशीरपणे वादी–प्रतिवादी मधील करार मोडून ते आंबे स्वतः पाडून विक्री करण्याचे प्रयत्नात आहे. तसे केल्यास वादीचे आर्थिक नुकसान होईल तसेच वादीचे कायदेशीर अधिकारांवर अतिक्रमण करुन वादीचे पैशाचे स्वरुपात भरुन न येणारे नुकसान करत आहे. सन २०२५ चे मे महिन्यात आंब्याच्या पाडयाचे मोसमातील आंबे वादीने मेहनत करुन पिक उभे असता त्या आंब्याचे झाडाचा पाडा प्रतिवादीने केल्यास वादीचे न्याय्य हक्क डावलेले जातील व वादीचे पैशाचे स्वरुपात न भरुन येणारे नुकसान होईल.

०३. अशा परिस्थितीत दावा मिळकतीतील आंबे हे न्यायालयाचा प्राप्तकर्ता (कोर्ट रिसिव्हर) ची नियुक्ती करुन ते पाडुन घेणे व सदर आंब्याचा पाडा करुन

त्याचा पंचनामा करुन आंबे विकुन, जमा खर्चाचा ताळेबंद लेखी स्वरुपात नोंदवुन त्याच्यातुन येणारा मोबदला मा. न्यायालयात दाव्याचे कामी भरणा करणे अथवा वादीला तशी अनुमती देवुन ते मा. न्यायालयात दाखल करणेची अनुमती देणे न्यायाचे हितास्तव आवश्यक आहे. वैकिल्पकरित्या दावा मिळकतीत आंब्याचा पाडा प्रतिवादीने करावा असे मा. न्यायालयाचे मत असल्यास प्रतिवादीने दावा मिळकतीतील आंब्याचे झाडाचा पाडा करुन त्याचा पंचनामा वादी व न्यायालयाचा प्राप्तकर्ता (कोर्ट रिसिव्हर) समोर घेऊन त्याचा मोबदला प्रतिवादीने मा. न्यायालयात भराण करण्याचे आदेश होणे न्यायाचे हितास्तव आवश्यक आहे. सदर न्यायालयाचा प्राप्तकर्ता (कोर्ट रिसिव्हर) यांनी दावा मिळकतीतील आंब्याचा पाडा केल्यावर पाडा केलेले आंब्याचे मोजमाप करुन ते आंबे पंचनाम्यात नमुद करुन त्यांच्या पेटयांचे नंबर पंचनाम्यात नमुद करावेत. तसेच सदर आंब्यांची विक्री व त्या करीता झालेला जमा खर्च यांचा ताळेबंद मा. न्यायालयात सादर करुन तसा मोबदला मा. न्यायालयात दाव्याचे कामी भरणा करण्याची विनंती केली आहे व वादीचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. प्रतिवादीने निशाणी क्र.२४ वर त्याचे म्हणणे दाखल केले आहे. त्याने वादीच्या अर्जातील कथने खोटी व अप्रामाणिकपणाची असुन ती नाकारली आहे. त्याचे असे कथन आहे की, दावा मिळकतीमधील आंब्याचा पाडा करण्याकरिता वादी व प्रतिवादीमध्ये लेखी अथवा तोंडी करार झालेला नाही व त्याकरिता प्रतिवादी याने एक रुपया सुध्दा घेतलेला नाही. प्रतिवादीचे दावा मिळकतीतील पीक विनामोबदला गिळंकृत करण्यासाठी वादीने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादीने सन २०२५ चा आंब्याचा पाडा करण्यासाठी अनीस पांगारकर यांना करारपत्र दि.०९/०८/२०२४ रोजी लिहून दिले आहे. त्याची माहिती वादीला आहे, परंतु,

वादीने त्याबाबत कधीही हरकत घेतलेली नाही. दावा मिळकत वादीच्या मालकीची असल्याने वादीचे हक्क डावलण्याचा प्रश्न येत नाही. सदरचा अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे. त्यामुळे त्याने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०५. संचिकेवरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीतर्फे वकील श्री. वढावकर व प्रतिवादी तर्फे वकील श्री. शेख यांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुत अर्जामध्ये दावा मिळकतीत असलेल्या मे २०२५ च्या मोसमातील आंब्याचा पाडा करण्याकरिता न्यायालयीन रिसीव्हर नेमण्याची विनंती केली आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये वादीने प्रतिवादी विरुध्द दाखल केलेला मनाई हुकुमाचा अर्ज हा गुणदोषावर नामंजूर करण्यात आलेला आहे. वादीच्या दाव्यातील कथनावरुन असे दिसुन येते की, वादीने दावा मिळकत ही प्रतिवादीच्या मालकीची असल्याचे व त्यामध्ये प्रतिवादीची १२५ हापुस आंब्याची व रायवळ आंब्यांची बाजती झाडे असल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे दावा मिळकतीतील आंब्याच्या झाडांची मालकी ही प्रतिवादीची आहे असे स्पष्टपणे दिसुन येते. त्यामुळे प्रस्तुत दाव्यामध्ये दावा मिळकती विषयी किंवा दावा मिळकतीत असणाऱ्या आंब्याच्या झाडाच्या मालकी विषयी कोणताही वाद नाही.

०६. वादी व प्रतिवादी यांच्यात सन २०२४-२०२५ या कालावधीकरिता दावा मिळकतीत असलेल्या आंब्याचा पाडा करण्यासाठी तोंडी करार झाला होता या विषयी वाद असल्याचे दिसुन येत आहे. परंतु, सदर करार अस्तित्वात असल्याबाबत कोणताही सकृतदर्शनी पुरावा संचिकेवर दाखल नाही. सदर कराराप्रमाणे वादीने दावा मिळकतीत आंब्याच्या झाडांना फळ लागण्यापुर्वी सन २०२४-२०२५ या

कालावधीमध्ये संपुर्ण वर्षभर कामे केली आहेत हे दाखवणारा कोणताही सकृतदर्शनी पुरावा संचिकेवर आलेला नाही.

०७. संचिकेवर दाखल कागदपत्रावरुन तसेच दोन्ही पक्षकारांच्या कथनांवरुन असे स्पष्टपणे दिसुन येते की, वादी व प्रतिवादीमध्ये दावा मिळकतीतील आंब्याच्या बागेच्या सन २०२४-२०२५ या कालावधीमध्ये आंब्याचा पाडा करण्याचा कराराबाबत जुन २०२४ मध्ये वाद निर्माण झाला होता व प्रतिवादीने वादीला आंब्याच्या बागेत येण्यासाठी व कोणतेही काम करण्यास विरोध केलेला आहे. तसेच संचिकेवरील कथनांवरुन व कागदपत्रांवरुन असेही दिसुन येते की, जुलै २०२४ नंतर वादीने आंब्याच्या बागेत बागेसाठी झाडांची देखरेख करणे, खते घालणे, साफसफाई करणे, मंदुकली तोडणे, आळी करणे, फवारणी करणे अशा प्रकारची कोणतीही कामे केलेली नाहीत. प्रतिवादीने दावा मिळकतीतील आंब्याच्या बागेचा सन २०२४-२०२५ या कालावधीमध्ये आंब्याचा पाडा करण्याचा करार हा अनीस पांगारकर यांच्यासोबत केलेला आहे व अनीस पांगारकर याने सन २०२४-२०२५ या काळामध्ये बागेसाठी झाडांची देखरेख करणे, खते घालणे, साफसफाई करणे इत्यादी कामे केलेली आहेत. अनीस पांगारकर याने सदर करारापोटी प्रतिवादीला ५० हजार रुपये रक्कम दिल्याचे करारावरुन दिसुन येत आहे. त्यामुळे दावा मिळकतीतील सन २०२४ ते २०२५ या कालावधीत येणाऱ्या आंब्याचा पाडा करण्याचा अधिकार हा प्रतिवादीने अनीस पांगारकर याला दिलेला आहे, असे संचिकेवरील दाखल कागदपत्रांवरुन प्रथमदर्शनी दिसुन येत आहे.

०८. त्यामुळे वर नमूद परिस्थितीत दावा मिळकतीत सन २०२४ ते २०२५ या कालावधीत मे २०२५ मध्ये येणाऱ्या आंब्याचा पाडा करण्याचा अधिकार हा प्रतिवादीला किंवा त्याच्या वतीने अनीस पांगारकरला असल्याचे प्रथमदर्शनी

दिसुन येत आहे. वादीने सन २०२४ ते २०२५ या संपुर्ण एक वर्षाच्या कालावधीत जुलै २०२४ ते मे २०२५ पर्यंत दावा मिळकतीत असलेल्या आंब्याच्या बागेची झाडांची देखरेख करणे, खते घालणे, साफसफाई करणे, मंदुकली तोडणे, आळी करणे, फवारणी करणे इत्यादी कामे केली असती तर वादीला निश्चितपणे एप्रिल-मे या महिन्यात दावा मिळकतीत येणाऱ्या आंब्यांच्या फळाचा पाडा करण्याचा अधिकार राहिला असता. परंतु, वादीने सन २०२४ ते २०२५ या कालावधीतील कराराच्या अनुषंगाने जुलै २०२४ नंतर दावा मिळकतीतील आंब्याच्या बागेत कोणत्याही प्रकारचे काम केले असल्याबाबत कथन केलेले नाही किंवा सकृतदर्शनी पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे दावा मिळकतीतील आंब्याच्या बागेसाठी सन २०२४ ते २०२५ या कालावधीसाठी आंब्याचा पाडा करण्याचा अधिकार वादीला असल्याचे वादीने प्रथमदर्शनी सिध्द केलेले नाही. अशा परिस्थितीत न्यायालयीन रिसीव्हर नियुक्त केल्यास प्रतिवादीला व त्याच्या तर्फे अनीस पांगारकर यांना दावा मिळकतीतील आंब्याचा पाडा करण्याच्या हक्कावर गदा येणार आहे व त्यामुळे त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. करिता मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

वादीचा न्यायालयाचा प्राप्तकर्ता (कोर्ट रिसिव्हर) नियुक्त करण्याचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

ANIL SITARAM SATOTE
Digitally signed by ANIL SITARAM SATOTE
Date: 2025.04.29 11:16:21 +0530

ठिकाण-श्रीवर्धन, (श्री. ए. एस. साटोटे)
दिनांक – २५/०४/२०२५ दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर श्रीवर्धन